IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# औरंगाबाद जिल्ह्यातील भूमी उपयोग व पिकाखालील क्षेत्र: एक भौगोलिक विश्लेषण

**डॉ. जोगेंद्र रामराव गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक,
भूगोल विभाग,
स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड.

**जळगावकर श्रद्धा बाबुराव**
संशोधक विद्यार्थी
भूगोल विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय,चुसाळा, बीड.

**सारांशः-**

कृषी हा मानवाचा प्राचीन व मूलभूत व्यवसाय असून, कृषीतून मानवास अन्न व पशूना चारा उपलब्ध होत असतो. शहरी उद्योगांना कृषीतूनच कच्चा मालाचा पुरवठा केला जातो. म्हणून कृषीला जगातील बहुतांशी अर्थव्यवस्थेत महत्त्व आहे. भारतातही ७० टक्के पर्यंत लोकसंख्या कृषीवर अवलंबून आहे. त्यामुळे कृषीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला गेला. या कृषी अंतर्गत बहुतांश भाग भूमी उपयोगाने व्यापल्यामुळे, कृषीचा मूलाधारच भूमी आहे. म्हणून कृषी व्यवस्थेत भूमीला विशेष स्थान आहे. औरंगाबाद जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यामुळे भूमी उपयोगाचे स्वरूप बघता जिल्ह्यात शेतीसाठी बहुतांशी भूमी उपयोगात आणली जाते. या भूमी उपयोगात जिल्ह्यातील भौगोलिक क्षेत्र, वनव्याप्त क्षेत्र, लागवडीखालील क्षेत्र, निव्वळ पिकाखालील व प्रमुख पिकाखालील क्षेत्राचा सन २०२१-२२ या वर्षातील प्रस्तुत शोधनिबंधात अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

- **बीजसंज्ञा:** भूमी, उपयोजन, कृषी, पिके, क्षेत्र.

- **प्रस्तावना:-**


कृषी मानवाचा प्राचीन व मूलभूत व्यवसाय आहे. कृषी व्यवसायामुळेच मानवाने भटके जीवन सोडून वसाहती निर्माण केल्या. कृषी हा आज जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जगातील ५० टक्के तर विकसनशील देशातील ६५ टक्के लोकसंख्या कृषी व्यवसायावर अवलंबून आहे.[१] भारतात ७० टक्के

हुन अधिक लोकसंख्या ही कृषीवर अवलंबून आहे. म्हणून कृषीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो.[२] ही कृषी पूर्णपणे जमीन (भूमी) आधारित किया आहे.[३]

भूमी हा पृथ्वीच्या पृष्ठभागाचा घन भाग आहे.[४] भूमी ही महत्त्वाची नैसर्गिक संसाधन असून, जी उत्क्रांती, जो उत्क्रांती आणि जमिनीवरील सर्व प्रकारच्या जीवसृष्टीच्या विकासास समर्थन देते. भूमीचा वापर विशेषतः नैसर्गिक आणि मानवी घटकांमुळे प्रभावित होते.[५] आर.पी. सिंह यांच्या मते, जमीन, पाणी, हवा आणि मानव यांच्या कार्यातून भूमी उपयोजन निर्माण होतो.[६] अशा प्रकारे मानवाने बधिलेली इमारत, मानव ज्या रस्त्यावर प्रवास करतो, ज्या उद्यानात खेळतो, ज्या जमीनित पिके घेतली जातात आणि ज्या कुरणात जनावरे चारतात ते जमिनीचे वेगवेगळे उपयोग दर्शवितात.[७]

- **अभ्यास क्षेत्रः-**

औरंगाबद जिल्ह्याचे महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी स्थान आहे. जिल्हा १९०१८' ते २०°४०′ उत्तर अक्षांश आणि ७४०३४' ते ७६००४' पूर्व रेखांश दर-यान असून, जिल्ह्याला उत्तरेकडून जळगाव जिल्हा, पूर्वेस जालना जिल्हा, दक्षिणेस अहिल्यानगर व बीड जल्हे आणि पश्चिमेस नाशिक जिल्ह्याची सीमा लाभली आहे.[८] जिल्हा एकूण ०९ तालुक्यात विभागला आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०१३७.६१ चौ.कि.मी. इतके आहे. जनगणना २०११ नुसार जिल्ह्याची एकूण ३७०१२८२ इतकी लोकसंख्या व जिल्ह्यात १३५६ गावे आहेत.[९]




- **शोध निबंधाची उद्दिष्ट्ये**

१. अभ्यास क्षेत्रातील भूमी उपयोगाचा आढावा घेणे.

२. औरंगाबाद जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्राचा अभ्यास करणे.

- **संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधनावर आधारित असून, यामध्ये विषयाशी संबंधित पुस्तके, प्रकाशित शोध निबंध, जणगणना अहवाल (२०११), जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन आदि साधने तसेच भौगोलिक तंत्रप्रणालीत नकाशे, आलेख, जी.पी.एस., संगणक सॉफ्टवेअर आणि संकलित आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय पध्दत वापरण्यात आली आहे.

- **शोध निबंधाची मर्यादा:**

प्रस्तुत शोधनिबंधात औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय भूमी उपयोजन व पिकाखालील क्षेत्राचा अभ्यास समाविष्ट आहे. त्यासाठी सन २०२१-२२ या वर्षातील सांख्यिकीय आकडेवारीचा आधार घेण्यात आला आहे. ही शोधनिबंधाची मार्यादा आहे.

- **पूर्व संशोधन साहित्यः**

**१. कुमार विनोद (२०१६):**

यांनी त्यांच्या प्रकाशित लेखात लजैसलमेर जिल्ह्यातील भूमी वापर आणि पीक पध्दतीतील बदलांचे विश्लेषण केले आहे.

**२. नरूला एन.व्ही (२०२०)**

यांनी गोंदिया जिल्ह्यातील भूमी उपयोजनातील बदलांचे भोगोलिक विश्लेषण या प्रकाशित शोधनिबंधात सन २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये भूमी उपयोजनात बदल झाल्याचे स्पष्ट केले.

- **विषय विवेचनः**

अ. औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय सन २०२१ २२ या वर्षातील भुमी उपयोजन पुढील तक्त्यात दर्शविण्यात आले आहे.

औरंगाबाद जिल्हा: तालुका-निहाय भूमी उपयोग तक्ता क्र. १

| अ.क्र. | तालुके | एकूण भौगोलिक क्षेत्र | वनव्याप्त क्षेत्र | लागवडीखालील एकूण क्षेत्र | लागवडीखालील निव्वळ क्षेत्र (हेक्टरमध्ये ) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पिकाखालील क्षेत्र | सिंचित क्षेत्र |
| 1 | कन्नड | 155547 | 30312 | 154607 | 105080 | 21794 |
| 2 | सोयगाव | 54497 | 12511 | 55023 | 37931 | 6797 |
| 3 | सिल्लोड | 151723 | 2827 | 155825.4 | 95913 | 7252 |
| 4 | फुलंब्री | 66269 | 4425 | 78914 | 54578 | 10125 |
| 5 | औरंगाबाद | 94777 | 22463 | 97980 | 61796 | 14143 |
| 6 | खुलताबाद | 51846 | 2047 | 54383 | 33110 | 7327 |
| 7 | वैजापूर | 159403 | 3057 | 168525 | 140366 | 32904 |
| 8 | गंगापूर | 130846 | 2219 | 134976 | 97837 | 25105 |
| 9 | पैठण | 142812 | 1554 | 130069 | 101830 | 28198 |
| **एकूण** | | 1007720 | 81415 | 1030310 | 728441 | 153645 |

**स्त्रोत:** जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन, औरंगाबाद-२०२२

वरिल तक्ता व ग्राफनुसार औरंगाबाद जिल्ह्यात सन २०२१-२२ मध्ये तालुकानिहाय एकूण भौगोलिक क्षेत्र १००७७२० हेक्टर, एकूण वनव्याप्त क्षेत्र ८१४१५ हेक्टर, लागवडी योग्य क्षेत्र १०३०३१० हेक्टर, निव्वह पिकाअंतर्गत क्षेत्र ७२८४४१ हेक्टर तर निव्व सिंचित क्षेत्र हे १५३६४५ हेक्टर इतके आढळते.

**१. भौगोलिक क्षेत्र**

जिल्ह्यात तालुकानिहाय सर्वाधिक १५९४०३ हेक्टर भौगोलिक क्षेत्र हे वैजापूर तालुक्यात आहे. त्यानंतर कन्नड तालुक्याता १५५५४७ हेक्टर, सिल्लोड तालुक्यात १५१७२३ हेक्टर, पैठण तालुक्यात १४२८१२ हेक्टर, गंगापुर तालुक्यात १३०८४६ हेक्टर, औरंगाबाद तालुक्यात ९४७७७ हेक्टर, फुलंब्री तालुक्यात ६६२६९ हेक्टर, सोयगाव तालुक्यात ५४४९७ हेक्टर तर इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वात कमी ५१८४६ हेक्टर भौगोलिक क्षेत्र खुलताबाद तालुक्याचे आहे.

**२. बनव्याप्त क्षेत्र**

जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात सर्वाधिक ३०२१२ हेक्टर वनव्याप्त क्षेत आहे तर इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वात कमी १५५४ हेक्टर वनव्याप्त क्षेत्र पैठण तालुक्यात आढळते.

**२. वनव्याप्त क्षेत्र**

जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात सर्वाधिक ३०२१२ हेक्टर वनव्याप्त क्षेत आहे तर इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वात कमी १५५४ हेक्टर वनव्याप्त क्षेत्र पैठण तालुक्यात आढळते.

**३. लागवडीखालील एकूण क्षेत्र**

अभ्यास क्षेत्रात लागवडीखालील सर्वाधिक १६८५२५ हेक्टर क्षेत्र हे वैजापूर तालुक्यात तर खुलताबाद तालुक्यात इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वात कमी ५४३८३ हेक्टर लागवडी खालील क्षेत्र आहे.

**४. लागवडीखालील निव्वळ क्षेत्र**

जिल्ह्यात निव्वळ पिकाअंतर्गत सर्वाधिक १४०३३६ हेक्टर क्षेत्र हे वैजापुर तालुक्यात आहे तर सर्वात कमी ३३११० हेक्टर निव्वळ पीकाखालील क्षेत्र हे खुलताबाद तालुक्यात आहे. तसेच जिल्ह्यात इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वाधिक ३२९०४ हेक्टर सिंचित क्षेत्र वैजापूर तालुक्यात आहे तर सर्वात कमी ६७९७ हेक्टर सिंचित क्षेत्र हे सोयगाव तालुक्यात आढळते.

**ब. अभ्यास क्षेत्रातील पीकाखालील क्षेत्र**


अभ्यास क्षेत्रात खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामात पिके घेतली जात असून खरीप हंगामात संकरीत ज्वारी, बाजरी, तूर, मूग, उडीद, कुळीथ, कापूस व भुईमूग ही पिके घेतात, तर बारमाही पिकांमध्ये ऊस आणि केळी ही मुख्य पिके असून उन्हाळी भुईमुग, सुर्यफुल, भाजीपाला आणि फळे ही पिकेही घेतली जातात.[११] जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र हे पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

**औरंगाबाद जिल्ह्यातील प्रमुख पिकाखालील क्षेत्र**

| अ.क्र. | तालुके | तृणधान्य | कडधान्य | कापूस | गळीत पिके |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कन्नड÷ | 73095 | 15279 | 42891 | 5696 |
| 2 | सोयगाव | 13172 | 4378 | 31156 | 3779 |
| 3 | सिल्लोड | 75810 | 22056 | 39043 | 12373 |
| 4 | फुलंब्री | 40397 | 8641 | 22840 | 1798 |
| 5 | औरंगाबाद | 32295 | 16964 | 03 | 00 |
| 6 | खुलताबाद | 2701 | 00 | 00 | 00 |

**स्रोत:** जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन, औरंगाबाद-२०२२

International Research Journal
IJNRD
Research Through Innovation




वरिल तक्ता व ग्राफनुसार वर्ष २०२१-२२ मध्ये, औरंगाबाद निल्यात एकूण लागवडी खालील क्षेत्र १०३०३१० हेक्टर इतके असून, त्यापैकी एकूण तृणधान्ये ३९१२३२ हेक्टर, कडधाण्ये १३३५८३, हेक्टर कापूस ३६१८२६ हेक्टर क्षेत्र तर गळीत विकासाखालील एकूण क्षेत्र ४७३२२ इतके हेक्टर आहे.

**१. तृणधान्ये पिकाअंतर्गत क्षेत्र**

जिल्ह्यात सर्वाधिक ७५८१० हेक्टर तृणधान्ये खालील क्षेत्र हे सिल्लोड तालुक्यात आहे तर इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वात कमी २७०५१ हेक्टर तृणधान्ये पिकाअंतर्गत क्षेत्र खुलताबाद तालुक्यात आहे.

**२. कडधान्ये पिकाखालील क्षेत्र**

अभ्यास क्षेत्रात कडधान्ये पिकाखालील सर्वाधिक २५४८० हेक्टर क्षेत्र पेठण तालुक्यात आहे तर सर्वात कमी ४३७८ हेक्टर कडधान्ये पिकाखालील क्षेत्र हे सोयगाव तालुक्यात आहे.

**३. कापुस पिकाखालील क्षेत्र**

जिल्ह्यात कापूस पिकाअंतर्गत सर्वाधिक ६३२९७ हेक्टर क्षेत्र हे वैजापूर तालूक्यात तर सर्वात कमी १२३६२ हेक्टर क्षेत्र में खुलताबाद तालुक्यात आहे.

**४. गळीत पिकाखालील क्षेत्र**

अभ्यास क्षेत्रात सिल्लोड तालुक्यात सर्वाधिक १२३७३ हेक्टर क्षेत्र गळीत पिकाखाली आहे तर फुलंब्री तालुक्यात इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वात कमी १७९८ हेक्टर गळीत पिकांतर्गत क्षेत्र आढळते.

**निष्कर्ष**

१. औरंगाबाद जिल्ह्यात एकूण भौगोलिक क्षेत्र १००७७२० हेक्टर इतके असून त्यापैकी सर्वाधिक १५९४०३ हेक्टर वेजापूर तालुक्यात इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वात कमी ४९८४३ हेक्टर भौगोलिक क्षेत्र हे खुलताबाद तालुक्यात आढळून आले.

२. जिल्ह्यात तालुकानिहाय सर्वाधिक ३०३२१ हेक्टर वनव्याप्त क्षेत्र कन्नड तालुक्यात तर इतर तालुक्याच्या तुलनेत कमी १५५४ हेक्टर वनव्याप्त क्षेत्र पैठण तालुक्यात दिसून आले.

३. अभ्यास क्षेत्रात लागवडी खालील आणि निव्वळ पिकाखालील सर्वाधिक अनुक्रमे १६८५२५ व १४०३३६ हेक्टर क्षेत्र हे वैजापूर तालुक्यात आढळून आले.

४. जिल्ह्यात तृणधान्ये पिकाअंतर्गत सर्वाधिक ७५८१० हेक्टर क्षेत्र हे सिल्लोड तालुक्यात तर इतर तालुक्याच्या तुलनेत कमी २७०५१ हेक्टर क्षेत्र खुलताबाद तालुक्यात दिसून आले.

५. अभ्यास क्षेत्रात पैठण तालुक्यात कडधान्ये पिकाअंतर्गत सर्वाधिक २५४८० हेक्टर क्षेत्र पैठण तालुक्यात आढळले.

६. जिल्ह्यात कापूस पिकाअंतर्गत सर्वाधिक ६३२९७ हेक्टर क्षेत्र हे वैजापूर तालुक्यात तर गळीत पिकाखालील सर्वाधिक १२३७३ हेक्टर क्षेत्र हे सिल्लोड तसीलमध्ये आढळून आले.

७. अशा त-हेने औरंगाबाद जिल्ह्यातील भूमीचा भोगोलिक क्षेत्र, वन, सिंचन व विविध प्रमुख पिका अंतर्गत उपभोग झालेला दिसून येतो.

**संदर्भ सूची**

१. सवदी ए.बी. आणि कोळेकर पी.एस. (२०१९), भूगोलाची मुलतत्त्व-२ (मानवी भूगोल), निराली प्रकाशन, पुणे, पृ.१११

२. Chattergjee Rupali (2017), Geography of India, Global Vision Publishing House, New Delhi, P.103

३. Arunachalam P. (2014), Geography of India, Physical, Political and Commercial, Swastik Publications, New Delhi, P.131

४. Chopra Girish (2011), Agricultural Geography, Common wealth Publications, New Delhi, P.72

५. Kumar Vinod (2016), Land Ufe Cropping Pattern In Jaisalmer District, International Journal of Science Engineering and Technology Research, Vo-5, Issue-4, P.1080

६. फुले सुरेश (२०००), कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृ.१७०

७. Aruna Chalam P. (2014), Geography of India, P. 127

८. Census of India (2011), District Census Handbook, Aurangabad District, Series-28, Part XII-A, P.11

९. महाराष्ट्र शासन (२०१५), जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा- औरंगाबाद, पृ.१,२,४

१०. महाराष्ट्र शासन (२०२२), जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा- औरंगाबाद, पृ.६५,७१

११. कित्ता, पृ.१६

१२. कित्ता, पृ.६७,७०,७१,६८

१३. नरूले एन.व्ही. (२०२०), गोंदिया जिल्ह्यातील भूमी उपयोजनातील बदलांचे भौगोलिक विश्लेषण (२००१-२०११) Research Journal of India, Vol-7, Issue-9

१४. censusindia.gov.in dchb>DCHB-A-2011

१५. https:/mahades.maharashtra.gove.in